# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
# जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/ कृ.उ.बा.स. /जि.नि.अ./खाते उघडणे/ ९१२ /२०२१. दिनांकः- ०५/०५/२०२१.

**वाचले :-** १. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुद.

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (ब), (३), (४) व (५) मधील तरतुद

३. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. ७६/सन २०१८, दिनांक ०४.०१.२०१८.

४. या प्राधिकरणाकडील आदेश जा.क्र. १४५३/सन २०२१, दिनांक २९.४.२०२१.

५. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (पाच).

**प्रस्तावना :-**

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुदीनुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांचे अधीक्षण, निदेशन व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपवलेली आहे.

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (ब) मधील तरतुदीनुसार मतदारांची यादी तयार करण्याच्या आणि निवडणूकांचे कामकाज चालविण्याच्या प्रयोजनासाठी प्रत्येक बाजार समितीने अधिनियमान्वये तिला कोणत्याही वर्षात फीच्या रुपाने मिळालेल्या सर्व रक्कमांच्या दहा टक्के किंवा एक लाख रुपये यांपैकी जे कमी असेल त्या रकमेचा मिळून होईल असा निवडणूक निधी स्थापन करणे बंधनकारक आहे.

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (३) मधील तरतुदीनुसार प्रत्येक बाजार समितीने दरवर्षी ३१ ऑक्टोबरपर्यंत आणि राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण फर्माविल अशा इतर कोणत्याही वेळीसुध्दा निवडणूक निधीत जमा असलेल्या रकमेबाबत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास कळवीणे बंधनकारक आहे.

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (४) मधील तरतुदीनुसार मतदारांची यादी तयार करण्यासाठी किंवा ती सुधारण्यासाठी किंवा यथास्थिती, निवडणूकांचे कामकाज चालविण्यासाठी किंवा या दोन्हींसाठी लागणारा खर्च भागविण्यासाठी लेखी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी रक्कम विनिर्दिष्ट दिनांकापूर्वी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे जमा करणे बाबत संबंधीत बाजार समितीस फर्मावण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत.

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (५) मधील तरतुदीनुसार बाजार समितीच्या निवडणूकीकरता खर्च न झालेली उर्वरीत रक्कम असल्यास ती बाजार समितीस परत करणे आणि खर्च झालेली रक्कम जमा केलेल्या रक्कमेपेक्षा अधिक असेल तर राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण तो विनिर्दिष्ट करील तेवढी जादा रक्कम निदेश मिळाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या

आत भरण्यास संबंधीत बाजार समितीस फर्मावण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत. बाजार समितीस अशा निदेशांचे पालन करणे बंधनकारक आहे.

ज्या अर्थी प्राधिकरणाने वाचले क्रमांक ३ च्या आदेशानुसार कृषि उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूक प्रयोजनार्थ लागणारा निवडणूक निधी जमा व खर्च करण्याकरीता जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) या नावाने राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र निवडणूक निधी खाते उघडण्यास संबंधीत जिल्हाधिकारी यांना परवानगी दिलेली आहे.

ज्या अर्थी प्राधिकरणाने वाचले क्रमांक ४ च्या आदेशानुसार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या पर्यवेक्षणाखाली व नियंत्रणाखाली जिल्हयातील किंवा प्रदेशातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला त्यांची कार्ये पार पाडतांना सहाय्य करण्याकरीता संबंधीत जिल्हयाकरीता जिल्हाधिकारी यांचे ऐवजी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांची "जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.ब.स.)" म्हणून नेमणूक केलेली आहे.

ज्या अर्थी महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (ब), (३), (४) व (५) चे निवडणूक निधी संदर्भात राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त असलेले अधिकार जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांना प्रदान करणे आवश्यक आहे.

ज्या अर्थी महाराष्ट्र कृषि उत्पन्न् बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ६७ (३) मधील तरतुदीनुसार जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा यथास्थिती निवडणूक निर्णय अधिकारी यांनी निवडणूकीकरीता प्राप्त झालेला निवडणूक निधीचे विवरण व निवडणूकीकरीता झालेला खर्च व त्याची देयके बाजार समितीची निवडणूक झाल्यापासून तीन महिन्याच्या आत राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाकडे पाठवणे बंधनकारक आहे. तसेच जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी खर्च न केलेली शिल्लक रक्कम कोणतीही असल्यास बाजार समितीला परत करणे अनिवार्य आहे.

ज्या अर्थी महाराष्ट्र कृषि उत्पन्न् बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (पाच) मधील तरतुदीनुसार कृषि उत्पन्न बाजार समित्यांनी निवडणूक निधीत आगाऊ जमा करावयाची आवश्यक असलेली निडणूक खर्चाची रक्कम कलम १४ च्या पोट कलम (१) अन्वये जमा करणे बाबत आदेश देण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत.

त्या अर्थी प्राधिकरण मतदारांची यादी तयार करण्याच्या आणि निवडणूकांचे कामकाज चालविण्याच्या प्रयोजनासाठी लागणारा निवडणूक निधी जमा व खर्च करणे संदर्भात खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

-:: आ दे श ::-

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ (अ) (१) व महाराष्ट्र कृषि उत्पन्न् बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम ३ (पाच) मधील तरतुदी अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण वाचले क्रमांक ३ चे आदेशामध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे सुधारीत आदेश पारीत करण्यात येत आहेत.

१. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ,उ.बा.स.) तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी "जिल्हा निवडणूक अधिकारी (ए.पी.एम.सी.)" या नावाने भारतीय स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेत स्वतंत्र निवडणूक निधी खाते उघडण्यात यावे.

२. तत्पूर्वी यापूर्वीचे जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) तथा जिल्हाधिकारी यांनी कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका घेण्याकरीता बाजार समितीकडून प्राप्त होणारा निधी जमा करण्याकरीता बँकेत सुरू केलेले निवडणूक निधी खाते बंद करून त्यावरील निधीचा रेखांकीत धनादेश / डिमांड ड्राफट आणि बँक खात्यामध्ये जमा झालेल्या निधीचा जमाखर्चाचा हिशोब प्राप्त करून घेण्याची जबाबदारी ही जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांची राहील.

३. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) (पहिली सुधारणा) नियम २०२० अंमलात येण्यापुर्वी म्हणजेच दिनांक १६.४.२०२१ पुर्वी जिल्हाधिकारी यांच्याकडे असलेला निवडणूक निधी अ.क्र. १ मधील नमूद खात्यावर जमा करण्यात यावा.

४. "निवडणूक निधीत" जमा होणाऱ्या आणि सदर निधीतूनं खर्च होणाऱ्या प्रत्येक रकमेचा तपशील आदेशासोबत जोडलेल्या प्रपत्र १, प्रपत्र २, प्रपत्र ३, प्रपत्र ४ व प्रपत्र ५ मध्ये अचूक नोंदवण्यात यावा.

**मा. आयुक्त राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने.**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

०५/०५/२०२१

(यशवंत गिरी)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

१. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व) (मुंबई १,२,३ व ४ वगळून)

२. जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई वगळून)

यांना कळविण्यात येते की, त्यांनी सुधारणेपुर्वी म्हणजेच दिनांक १६.४.२०२१ पुर्वी जमा असलेला निवडणूक निधी रेखांकीत धनादेश / डिमांड ड्राफटने आणि बँक खात्यामध्ये जमा झालेल्या निधीचा जमाखर्चाचा हिशोब जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे वर्ग करुन तसा अहवाल दि. १५/०५/२०२१ पूर्वी प्राधिकरणास सादर करावा.

प्रत पुढील कार्यवाहीस्तव :-

सभापती/प्रशासक,सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व)

| प्रपत्र १ | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्याकडील आदेश जा.क्र. , दिनांक चे सहपत्र) | | | | | | | | | | | | | |
| जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी ठेवावयाची रोजकिर्द (Cash Book) | | | | | | | | | | | | | |
| कृषि उत्पन्न बाजार समिती निवडणूक निधी रोजकिर्द (Cash Book) | | | | | | | | | | | | | |
| जमा (Receipts) | | | | | | | खर्च (Payments) | | | | | | |
| तारीख | पावती नं. | खाते नं. | जनरल लेजर पान नं. | नाव | तपशील | रक्कम रुपये | तारीख | पावती नं. | खाते नं. | जनरल लेजर पान नं. | नाव | तपशील | रक्कम रुपये |
| | | | | | | | | | | | | | |

सही/शिक्का
जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स)
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था

| प्रपत्र २ | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्याकडील आदेश जा.क्र. , दिनांक चे सहपत्र) | | | | | | | | | |
| जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, -------------- | | | | | | | | | |
| बाजार समिती निहाय गोषवारा | | | | | | | | | |
| अ.क्र. | बाजार समितीचे नाव | तालुका | जिल्हा | बाजार समितीकडून जमा निवडणूक निधी | | निवडणूक निधीमधून केलेला खर्च | बाजार समितीला परत केलेला निधी | | निवडणूक निर्णय अधिकारी नाव व पदनाम |
| | | | | रक्कम रुपये व धनादेश क्रमांक | दिनांक | रक्कम रुपये | रक्कम रुपये व धनादेश क्रमांक | दिनांक | |
| | | | | | | | | | |

सही/शिक्का
जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.)
तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था

| प्रपत्र ३ | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्याकडील आदेश जा.क्र. , दिनांक चे सहपत्र) | | | | | | | | | | | | | |
| निवडणूक निर्णय अधिकारी तथा ------------------------- | | | | | | | | | | | | | |
| कृषि उत्पन्न बाजार समिती निवडणूक निधी रोजकिर्द (Cash Book) | | | | | | | | | | | | | |
| जमा (Receipts) | | | | | | | खर्च (Payments) | | | | | | |
| तारीख | पावती नं. | खाते नं. | जनरल लेजर पान नं. | नाव | तपशील | रक्कम रुपये | तारीख | पावती नं. | खाते नं. | जनरल लेजर पान नं. | नाव | तपशील | रक्कम रुपये |
| | | | | | | | | | | | | | |

सही/शिक्का

निवडणूक निर्णय अधिकारी

तथा ------------------------------

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रपत्र ४ | | | | | | |
| (राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्याकडील आदेश जा.क्र. , दिनांक चे सहपत्र) | | | | | | |
| निवडणूक निर्णय अधिकारी तथा ---------------------------- | | | | | | |
| बाबवार खतावणी (General Ledger) | | | | | | |
| बाजार समितीचे नाव | | | | | | |
| निवडणूक कालावधी सन -------------- ते -------------- | | | | | | |
| निवडणूक निर्णय अधिकारी नाव व पदनाम | | | | | | |
| निवडणूक प्रक्रिया सुरु केल्याचा दिनांक | | | | | | |
| निवडणूक प्रक्रिया पुर्ण केल्याचा दिनांक | | | | | | |
| तारीख | किर्द पान नंबर | तपशील | जमा रक्कम रुपये | खर्च रक्कम रुपये | शिल्लक /वाढ | |
| | | | | | जमेकडील रक्कम रुपये | खर्चाकडील रक्कम रुपये |
| | | | | | | |

सही/शिक्का
निवडणूक निर्णय अधिकारी
तथा --------------------------------

प्रपत्र ५

(राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण यांच्याकडील आदेश जा.क्र. , दिनांक चे सहपत्र)

निवडणूक निर्णय अधिकारी तथा ---------------------------

जमा खर्च गोषवारा

| जिल्हा निवडणूक (कृ.उ.बा.स.) अधिकाऱ्याकडून जमा निवडणूक निधी | | नामनिर्देशन पत्र विक्रीतून प्राप्त रक्कम रुपये | उमेदवारांकडून जमा अनामत ठेव रक्कम रुपये | इतर किरकोळ जमा रुपये | एकुण जमा रुपये | उमेदवारांना परत केलेली एकुण अनामत ठेव |
|---|---|---|---|---|---|---|
| रक्कम व धनादेश क्रमांक | रुपये | | | | | |
| | | | | | | |

| एकुण शिल्लक रक्कम रुपये | | निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने केलेला एकुण खर्च रुपये | निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे शिल्लक राहिलेला निवडणूक निधी रुपये | निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यास परत केलेला निधी रक्कम रुपये व धनादेश क्रमांक | निवडणूक निर्णय अधिकारी सही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |